नियमीत फौ. ख.क्र. २६२/२०२२
सरकार विरुध्द महेश
निशाणी क्र.१६

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०१) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– नारायण दत्तात्रय बडे,
वय सुमारेः– ४३ वर्ष, व्यवसायः–पो. ना.
नेमणुक–पाथर्डी पोलिस स्टेशन ता. पाथर्डी जि. अहमदनगर

**सर तपासणी**

**अभियोग पक्षाकरिता श्री. ए. बी. विधाटे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

दि.०५.०८.२०२१ रोजी मी उपविभागीय पोलिस अधिकारी कार्यालय शेवगाव येथे पो. ना. म्हणून कार्यरत होतो. त्या दिवशी उपविभागीय पोलिस अधिकारी यांनी बोलावून आम्हाला सांगितले की, पिंपळगाव शिवारामध्ये कारीची नदीमध्ये एक इसम अवैध वाळु वाहतूक करीत असल्याचे गुप्त माहिती पहाटे ४.०० वाजता मिळाल्याचे सांगितले.त्यानंतर मी, सहा. फौ.रांजणे, पो. ना. बडे, पो. कॉ.पाथरे, पो. कॉ. खिळे असे खाजगी वाहनाने पाथर्डी पोलिस स्टेशन येथे आलो. पाथर्डी पोलिस स्टेशन येथे आल्यानंतर सहा. फौ. रांजणे यांनी दोन पंचांना बोलावून त्यांना बातमीची मुळ हकिकत समजावून सांगितली. त्यानंतर पंचनामा करणेसाठी दोन्ही पंच तयार झाले. त्यानंतर आम्ही तसेच पंच खाजगी वाहनाने पिंपळगव्हाण गावच्या कारी नदी येथे पहाटे ४.४५ वाजता पोहोचलो. त्या ठिकाणी आम्ही गाडी कच्च्या रस्त्यावर लावली. पहाटे ६.०० च्या सुमारास आरोपी नदीमध्ये वाळू भरताना दिसला. त्यानंतर सहा फौ रांजणे यांनी आरोपीचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव महेश बबन ढोले सांगितले. तसेच त्याच्याकडे वाळू परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने परवाना नसल्याचे सांगितले. त्यानंतर त्या ठिकाणी पंचनामा करुन अंदाजे १ ब्रास वाळू ट्रॅक्टरसह आम्ही जप्त केली. त्यानंतर आरोपी याला ट्रॅक्टर वाळूसह घेवून आम्ही पाथर्डी पोलिस स्टेशनला आलो. त्यानंतर मी सरकारतर्फे आरोपीविरुध्द फिर्याद दाखल केली. आता मला दाखविण्यात आलेली फिर्याद तीच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यावर माझी सही आहे. **फिर्यादीस निशाणी १७ देण्यात** येते. फिर्याद दिल्यानंतर दुस–या दिवशी मला ट्रॅक्टर क्रमांक एम एच २३ ३७९२ असल्याचे समजले. त्यानुसार माझा पोलिसांनी पुरवणी जबाब नोंदविला. आरोपीस पाहिल्यास मी

ओळखू शकतो. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पुर्ण.

**उलट तपासणी आरोपीकरिता श्री. के. एस. एकशिंगे वकील**

२. आम्ही ज्या खाजगी वाहनाने गेलो त्याचा नंबर मी सांगू शकत नाही.

प्रश्न– त्या वाहनाचा चालक कोण होता व कोणाच्या मालकीचे होते हे तुम्ही सांगू शकत नाही ?

उत्तर– पो. कॉ. रांजणे यांचेच ते वाहन होते.

३. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही जे वाहन घेवून गेलो त्या वाहनाची नोंद पोलिस स्टेशन डायरीला केली नाही. आमच्यासोबत जे पंच होते त्यांचे नाव गाव मी सांगू शकत नाही. ज्या कच्च्या रस्त्यावर आम्ही गाडी उभी केली तेथून नदी अंदाजे १ किमी अंतरावर होती. ट्रॅक्टरमधे वाळू भरणेकरीता मजूर किंवा मशिनची गरज पडते. आम्हाला वाळूने भरलेला ट्रॅक्टर फक्त त्या ठिकाणी मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने तेथून वाळू भरलेली नाही व ती मिळूनही आली नाही. हे म्हणणे खरे आहे की, ट्रॅक्टरमध्ये वाळू भरताना आम्ही समक्ष पाहिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकूर मी खोटा सांगितला. हे म्हणणे खरे नाही की, खोटी फिर्याद दाखल करून मी खोटी साक्ष दिली आहे.

...उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः ०२.०२.२०२६.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.02.02 16:48:13 +0530

(**रविकिरण सपाटे** )

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

पाथर्डी जि. अहमदनगर.